Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

33

# मराठी कादंबरी वाङ्.मयातील वैदर्भीय लेखिकांचे योगदान

**प्रा. उन्नती संजय चौधरी**
खिरोदा ता. रावेर जि. जळगाव

---

**प्रास्ताविक**

कादंबरी हा वाङ्.मय प्रकार तसा दीर्घ अवकाश व्यापणारा व अनेक घटना, प्रसंग, कथानक, उपकथानक असणारा असा आहे. त्यासाठी चिंतन, वेळ आणि अनुभवाची समृद्धता असावी लागते, परंतु विदर्भातील लेखिकांनी हे आव्हानही पेलून कादंबरी लेखन केलेले आहे. त्यात स्वतःचे स्थानही निर्माण केलेले आहे.

**प्रतिमा इंगोले** यांनी कथालेखन मोठ्या प्रमाणात केले आहे. त्यांच्या ठिकाणची अनुभवाची व्यापकता ही त्यांनी कादंबरीच्या रूपानेही मांडलेली आहे. 'बुढाई', 'पार्टटाईम' या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्याचे विश्लेषण करताना अजय मुरादे यांनी लिहिले आहे की, "एका मोलमजुरी करणाऱ्या आणि प्रामाणिक जीवन जगणाऱ्या दुबळया कुटुंबाला दुःखाच्या खाईत हळूहळू नेऊन सोडणाऱ्या व्यवस्थेचे हे चित्रण लेखिकेने अत्यंत ताकदीने रंगविले आहे. कादंबरीचा शेवट दुःखमय आहे. सत्तूची व तिच्या आईवडिलांची दुःखगर्भिता, सत्तूच्या नवऱ्याचा संशयीपणा, राक्षसीपणा या साऱ्या गोष्टींचे चित्रण प्रतिमा इंगोले यांनी प्रभावीपणे केलेले आहे."[१] वऱ्हाडी बोली भाषेत पूर्ण कादंबरी लिहून इंगोले यांनी कादंबरीच्या भाषेचे वेगळेपण राखले आहे.खेड्यातील लोकजीवन व लोकसंस्कृतीचा प्रभाव त्यांच्या लेखनावर आहे. कुटुंब व समाजातून स्त्रीच्या वाट्याला येणारे दुःख त्यांनी त्यातून सांगितले आहे.त्यांच्या कादंबऱ्यातून ग्रामीण अनुभवविश्व प्रकट झालेले आहे.

**आशा बगे** ह्या विदर्भातील जेष्ठ लेखिका असून त्यांनी मोठ्या प्रमाणात कादंबरीलेखन केले आहे.त्यांच्या अनुभवाची समृद्धता त्यातून सहज प्रत्ययाला येणारी आहे. कौटुंबिक व सामाजिक जीवनात स्त्रीचे स्थान, बदलत्या जीवनमूल्यांचे व्यक्तीच्या जगण्यावर होणारे परिणाम आणि त्यातून उद्भवणारे संघर्ष याचे चित्रण त्यांनी केले आहे. मच्छिंद्र गोटे यांच्या मते, "आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील नायिका स्वाभिमानी, जिद्दी, कर्तृत्ववान, तडफदार व आधुनिक असली तरी जुन्या परंपरेच्या मानवी मूल्यांतून बाहेर पडताना दिसत नाही. ती परंपराशरण अशी स्त्री आहे."[२]

बगे यांच्या कादंबऱ्या स्त्रीकेंद्रित अधिक असल्या तरी स्त्री व पुरूष यांच्यातील नातेसंबंध त्या प्रकट करतात. तेव्हा परंपराशरण आणि परंपरेला नाकारून आत्मप्रतिष्ठा, आत्मनिर्भर अशा विचाराने, नव्या मार्गाने त्यांच्या कादंबऱ्यांमधील नायिका वाटचाल करतात.तेव्हा पुरुषही त्याच्या स्वभाव,प्रवृत्ती तसेच पुरुषी मानसिकतेसह साकार होतात. भूमी या कादंबरीतील मैथिली ही अशी करिअरिस्ट तरूणी आहे.तसा तिचा नवरा हा देखील नोकरी करणारा आहे. त्याचा पुरुषी अहंकार दोघांमधील वितुष्ट निर्माण होण्याला कारण ठरतो. शेतू कादंबरीतील सुचरिता व 'घुंबर' कादंबरीतील वसुमती अशी काही नावे सांगता येतील. मानवी जीवनात नातेसंबंध खूप महत्त्वाचे असतात. परंपरेमुळे त्यात संघर्षही निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर त्यांच्या कादंबऱ्यांमधील नायिका वाचकांचे लक्ष वेधून घेतात, पण पुरुष दुर्लक्षित होतात, असे नाही .

**अर्चना गाडेकर** यांच्या सोलमेट कादंबरीतून स्त्री व पुरूष यांच्या अनोख्या मैत्रीचे दर्शन त्यांनी घडविले आहे. निराधार तरूणीला तिच्या मित्रांचा नि:स्वार्थ, निर्हेतूक आधार फार महत्वाचा असतो, हे सूत्र त्यात आहे. सुरेश द्वादशीवार यांनी लिहिले आहे की, "अशी नाती औपचारिक उरत नाहीत. ती अनौपचारिक होतात आणि तरीही औपचारिक संबंधातून येणाऱ्या सगळया जबाबदाऱ्या ती सहजपणे अंगावर घेतात. तो वा ती, तुझा वा तुझी काय लागतात, हा प्रश्न मग शिल्लक राहत नाही. नाती विरतात. जबाबदारी मात्र राहते. नात्यांचाच जबाबदारीत विलय होतो. अशी सहज,साधी, सुंदर आणि हवीहवीशी ओझी आपल्याही वाट्याला येतात. ती नाकारणे हा करंटेपणा. तिचा स्वीकार म्हणजे मैत्री आणि माणुसकी. त्या स्वीकाराला वयाची वा अन्य कुठलीही मर्यादा वा अट नाही. पण त्यातही ती स्वीकारतानाचे वय तरूण असेल तर त्याएवढी आनंदाची बाब दुसरी नाही. अशा जबाबदाऱ्या ओझी आणत नाहीत. त्या आनंदाचा ठेवा आणत असतात."[३]

स्वतःच्या पायावर उभे राहून आत्मनिर्भर व्हावे, आईचा सांभाळ करावा म्हणून या कादंबरीतील तरूणी उद्योग व्यवसायात कर्तृत्व गाजविण्यासाठी धडपडते. तिच्या या धडपडीत तिला तिचे मित्र मदत करतात. त्यांच्या मैत्रीत संघर्ष न घडता सहज ती जीवनध्येय पूर्ण करताना दिसते; हा एक सकारात्मक दृष्टिकोन लेखिकेने या कादंबरीतून मांडलेला आहे. व्यक्ती ही स्त्री किंवा पुरूष,अशी एकटी नसतेच. त्याचे सारे आयुष्य नातेसंबंधांनी बांधलेले असते. या नात्यात गोतावळयाबाहेरचे एक मित्रत्वाचे नाते असते आणि ते सर्वश्रेष्ठ असते, हा एक सुखद अनुभव या कादंबरीच्या कथानकातून लेखिकेने मांडलेला आहे. अभिराम भडकमकर यांनी म्हटले आहे की,

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved 

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

"आताशा चौकट मोडण्याची भाषा करणारी कथासुद्धा आकार घेताना, विकसित होताना स्वतःभोवती तशा प्रकारच्या लेखनाची एक चौकटच तयार होऊन बसते. तसं लेखिकेचं आणि म्हणूनच या कादंबरीचं होत नाही. म्हणूनच मग ही कादंबरी स्त्रीवादी, लिंगवादी, बंडखोर या चौकटीत मावत नाही. कदाचित नायिका ही बुद्धीवादी नसल्यामुळेही असेल, पण बुद्धीपेक्षा मनाचाच कौल घेत ती निर्णय घेते. त्या निर्णयात ती तिच्या सभोवतालच्या माणसांच्याही मनाचा विचार करत जगतेय."[४]

कुटुंब आणि समाज येथे माणसांची गर्दी असते. त्यात एकमेकांशी नातेसंबंध जुळतात. एकमेकांच्या आधाराने त्यांना आयुष्याची वाटचाल करायची असते, पण कोणी कोणाला बऱ्याचदा आधार देत नाही; या कादंबरीतील नायिकेचा काकाही तसाच स्वार्थी आणि वाईट प्रवृत्तीचा आहे, परंतु एक पुरूष वाईट, म्हणून सारेच वाईट असतात, असे नाही. या अर्थाने लेखिकेने श्री व कुलदीप हे दोन तरूण, दोन मित्र नायिकेच्या पाठीशी खंबीरपणे उभे कसे राहतात, याचे उत्तम चित्रण केले आहे.

**विजया मारोतकर** यांनी 'धुक्यात हरवलेली वाट' या कादंबरीतून सुनेत्रा ह्या बुद्धिमान व तरूण सुंदर नायिकेच्या चित्रणातून सामाजिक व शैक्षणिक वातावरण रेखांकित केले आहे. रंगराव बापू पाटील यांनी म्हटले आहे की, "कादंबरीचा मुख्य व मूळ हेतू म्हणजे मॉडर्न म्हणून जगणाऱ्या सुशिक्षित व सुधारक स्त्रीला मार्मिक इशारा देत ही कादंबरी शेवटाकडे वळते."[५] कारण कादंबरीतील सुनेत्रा बुद्धिमान असून ती कॉलेजला नोकरी करते. तिचा प्रेमविवाह होतो. नंतर घटस्फोट, पुन्हा दुसऱ्याशी विवाह, पुन्हा तिसऱ्या पुरूषाशी संबंध, असे तीन पुरूष तिच्या आयुष्यात येतात. तिचे व्यावहारिक दृष्टिकोन येथे चुकलेले दिसतात, म्हणून या कादंबरीला दिलेले शीर्षक सूचक वाटते.

**अरूणा सबाने** यांच्या दोन कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या असून त्यांनीही त्यात स्त्रीकेंद्रीत अनुभव प्रकट केले आहे, पण त्यातील स्त्रिया पीडित आहेत. किशोर सानप यांच्या मते "अरूणा सबाने ह्या विदर्भातील स्त्रीवादी चळवळीत सक्रिय कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या आहेत. लेखिकेची नैतिकता आणि सामाजिक उत्तरदायित्वाचे वाङ्मयीन भानही त्यांनी आपल्या कथा-कादंबरी-ललित व ललितेतर वैचारिक लेखनातून जपले आहे. लेखकाच्या संपूर्ण स्वातंत्र्याचा उपयोग करून लेखन करण्याची त्यांची लेखनवृत्ती आहे. एक सामाजिक कार्यकर्ता ते सामाजिक समस्यांवर विशेषतः स्त्रीत्वाचा स्वतंत्र पुरस्कार करणाऱ्या आणि आपल्या लेखनांतून आधुनिक आणि ग्लोबल युगात स्त्रीवादाचा पुरस्कार करणाऱ्या लेखिका आहेत."[६]

'विमुक्ता' आणि 'मुन्नी' या दोन्ही कादंबऱ्यातून त्याची प्रचिती येत असून सबाने यांनी स्त्रीमुक्तीचा आविष्कार त्यात केलेला आहे. एक स्त्रीवादी चळवळीतील कार्यकर्त्या म्हणून त्यांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेत स्त्रियांची होणारी कोंडी फोडण्याचे कार्य त्यांनी केले. कादंबऱ्यांमधूनही तशाच प्रकारची वस्तुनिष्ठ मांडणी केलेली आहे. स्त्रीचे स्वातंत्र्य, तिची आत्मनिर्भरता आणि तिला मोकळा श्वास घेता यावा, म्हणून तिला मिळणारा आधार, असे कथानक त्यांनी रचले आहे. स्त्रीच्या सांसारिक जीवनात अनेक प्रश्न निर्माण होतात. त्याकडे संवेदनशील मनाने त्यांच्या कादंबऱ्यांमधील नायिका पाहतात आणि स्वतःच्या अस्तित्वासाठी धडपडतात. तेव्हा कादंबरीचे कथानक प्रवाही बनत जाते; असे त्यांच्या कादंबऱ्यांच्या रचनेतून जाणवते.

**कुमुद मंडलेकर** यांच्या 'बाभळफूल' व 'डोंगरकडा' ह्या कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. स्त्री स्वातंत्र्य व तिची आत्मनिर्भरता याशिवाय स्त्रीचे अस्तित्व निर्माण होणार नाही. तिला आत्मसन्मान मिळणार नाही, असा लेखिकेचा दृष्टिकोन त्यातून प्रकट होतो. त्याविषयी मनोगत व्यक्त करताना त्या लिहितात की, "बाभळीचं झाड सर्वांनीच पाहिलेलं. काटेरी रंगाचं म्हणून प्रसिद्ध. फारसं लक्षात न ठेवण्याजोगं पण उपयोगाचं. बारिक पान असलेल्या फांद्या लहान लहान गोल आकाराच्या पिवळ्या फुलांनी डवरतात तेव्हा पाहत राहावसं वाटतं इतकं मोहकमयी होतं. नाजूक तंतूची ही फुलं गळतात, पायदळी तुडविल्या जातात, तेव्हा ही फुलं कुणाच्याही खिजगणतीत नसतात. या फुलांचा जन्मच मुळी काटेरी वातावरणातला. आदिवासी, ग्रामीण विभागातल्या मुलींच जगणं या फुलासारखंच, कुटुंबानं, समाजानं आणि नातेवाईकांनी आखून दिलेल्या रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांच्या वर्तुळातलं तिचं जगणं."[७] स्त्रीच्या जीवनात कितीही संकटे, अडथळे असले तरी तिने जिद्दीने पुढे मार्गक्रमण करावे.अशापद्धतीने त्यांच्या कादंबऱ्यांतील नायिका साकार होतात. त्यातील काही प्रसंग व्यक्तीजीवनाचा ठाव घेताना हृदयस्पर्शी बनतात. त्याला कारुण्याची किनार लाभलेली असते.

**सुप्रिया अय्यर** यांनी 'कन्याकोलम' या कादंबरीत स्त्रियांची अगतिकता ही पुरूषांमुळे निर्माण होते,अशा आशयाची मांडणी केलेली आहे. कौटुंबिक व सांसारिक जीवनात पुरूषाच्या बाहेरख्यालीपणामुळे सांसारिक जीवन विस्कळीत बनते,या संबंधीची उकल करताना लेखिकेने कुटुंबाचा परिचय कादंबरीच्या सुरूवातीला करून दिलेला आहे. तो असा "अम्माला चार बहिणी अन् एक भाऊ, सगळ्यात मोठी जानकी, ती इथंच तिरूअनंतपुरमला राहते. दुसरी सरस्वती शित्ती. पण ती कोट्टायमला राहते, म्हणून तिचं सरस्वती नाव मागे पडून तिला सारे कोट्टायम शित्तीच म्हणतात. कालच ती जानकी शित्तीकडचा मुक्काम आटोपून इकडे राहायला आलीस. तिसरी निलाक्षी शित्ती. सिंगापूरला राहते, म्हणून ती सिंगापूर शित्ती. चौथी अम्मा! अम्माचं नाव लक्ष्मी! आप्पांच नाव नारायणन!"[८]

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

स्त्री-पुरूष संबंध, स्त्रीचे वैधव्य, तिच्या जीवनातील चढउतार व पुरूषीवृत्ती याविषयीचे कथानक गुंफण्यासाठी अनेक पात्रे, घटना व प्रसंगांची निर्मिती लेखिकेने केलेली आहे. कादंबरीतील गुंतागुंत ही काहीशी रटाळ व पाल्हाडिक वाटते.

**सुनिता कावळे** यांनी 'कमला लेले' ही चरित्रपर कादंबरी लिहिलेली आहे. त्यातून त्यांनी महात्मा गांधी यांच्या स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झालेल्या स्त्रीचे दर्शन घडविले आहे. त्याविषयीची भूमिका त्यांनी सांगितली आहे की, "त्यांचा जीवनपट समाजासमोर यावा. समाजाला आणि विशेषतः तरूण वर्गाला देशनिष्ठेचं मोल कळावं, समाजसेवाचा अर्थ कळावा, ध्येयपूर्तीसाठी लागणारी जिद्द एखाद्या वस्तुपाठासारखी समोर यावी आणि मानवी जीवनाचा खरा अर्थ स्पष्ट व्हावा ह्या निर्भेळ हेतूनेच कमलताईच्या जीवनपटाला हे कादंबरीस्वरूप मी दिलंय."[९] स्वातंत्र्यपूर्व काळात समाजात स्त्रीविषयक अत्यंत कर्मठ मानसिकता असताना म. गांधी यांच्या स्वातंत्र्य चळवळीत अनेक स्त्रियांनी सहभाग घेतलेला होता. त्यांपैकी कादंबरीतील एक नायिका धीटपणे सार्वजनिक जीवनात समाजकार्य करते. स्त्री सुधारणांसाठी व राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी धडपडते. सामाजिक आणि वाङ्.मयीन क्षेत्रात स्वतःचा नावलौकिक मिळवते, असे कादंबरीतून दिसून येते.

**निष्कर्ष**

1. कादंबरी हा एक दीर्घ अवकाश व्यापणारा साहित्य प्रकार असून अनुभवाची मोठी व्याप्ती लेखकाकडे असावी लागते,विदर्भातील लेखिकांनी ते आव्हानही पेललेले दिसून येते.
2. विदर्भातील लेखिकांच्या कादंबऱ्यातून ग्रामीण व नागरी जीवनाचे दर्शन घडत असल्याने त्यांच्या अनुभवाची विविधता स्पष्ट होते. प्रतिमा इंगोले, कुमुद मंडलेकर यांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण केलेले आहे.
3. स्त्रीजीवनातील अनंत अडचणींचा लेखाजोखा विदर्भातील विदर्भातील लेखिकांच्या कादंबऱ्यातून मांडलेला आहे.
4. स्त्री सुधारणेचे पर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीविषयक कायदे होऊनही स्त्रीजीवनातील दुख ,तिचे स्वातंत्र्य व स्वावलंबन ,तिच्या अस्मिता , यासारखे प्रश्न विदर्भातील लेखिकांच्या कादंबऱ्यातून अधोरेखित झालेले आहेत.
5. उत्तर आधुनिक काळातही सामाजिक रूढी –परंपरेचा व मानसिकतेचा त्रास स्त्रीयांना होत असल्याचे विदर्भातील लेखिकांच्या कादंबऱ्यातून स्पष्ट होते.

**संदर्भसूची**

१ ) मुरादे अजय विनायकराव, प्रतिमा इंगोले यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या कलाशाखेतील आचार्य (पीएच.डी.) पदवीकरीता सादर केलेला शोधप्रबंध, पृ. ७५
२ ) गोटे मच्छिंद्र रामचंद्र, आशा बगे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री दर्शन : एक चिकित्सक अभ्यास, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध, ऑगस्ट २०१७, पृ. ४९
३ ) द्वादशीवर सुरेश, आशीर्वाद.....अर्चना गो अहेड, सोलमेट, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, २०१६, पृ. ८
४ ) भडकमकर अभिराम, प्रस्तावना, सोलमेट, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, २०१६, पृ. ९
५ ) मारोतकर विजया, धुक्यात हरवली वाट, दिलीपराज प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, २०१६, पृ. ८
६ ) डॉ. सानप किशोर, समकालीन स्त्रियांच्या कादंबऱ्या, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २०१२, पृ. १८६
७) मंडलेकर कुमुद, मनोगत, बा भूळफूल, ओंकार प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, २००९, पृ. ५
८ ) अय्यर सुप्रिया, कन्याकोलम, देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा.लि. पुणे, पहिली आवृत्ती, २०११, पृ. २
९ ) कावळे सुनीता, मनोगत, कमला लेले, मायबोली प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९९९, पृ. ५